# नवीन कृषी कायदानुसार कृषी व्यवस्थेचे भवितव्य

दत्तात्रय निवृत्ती रावण (एम.ए.भाग -२) राज्यशास्त्र अधिविभाग, शिवाजी विद्यापीठ,कोल्हापूर.

**सारांश :** आत्मनिर्भर भारत अभियानाचा एक भाग म्हणून शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढविण्यासाठी कृषी क्षेत्रातील सुधारणांसाठी भारत सरकारद्वारे घेतलेल्या महत्वपूर्ण निर्णयांच्या घोषणा केली आहे. कोविड-१९ संकटाच्या काळात जेव्हा संपूर्ण कृषी क्षेत्र सुधारणा प्रक्रियेला गती देणे, कृषीमालाचा राज्यांतर्गत आणि आंतरराज्य व्यापार वाढविण्यासाठी राष्ट्रीय कायदेशीर यंत्रणा तयार करण्याची आवश्यकतेसाठी सरकारने कायदा समंत केला आहे. अपेक्षित खरेदीदारांची संख्या वाढवून त्यांच्या पसंतीच्या ठिकाणी आपला शेतमाल विकण्याची शेतकऱ्याची आवश्यकता देखील सरकारने ओळखली आहे. शेती करारासाठी सोयीस्कर रचना आवश्यक असल्याचे देखील मान्य केले आहे. कृषी मालाच्या विपणनाच्या सर्वांगीण विकासात येणारे अडथळे ओळखून सरकारने राज्यांसाठी मॉडेल कृषी उत्पन्न आणि पशुधन विपणन (एपीएलएम) कायदा २०१७ तसेच मॉडेल कृषी उत्पन्न आणि पशुधन करार कृषी कायदा, २०१८ चा विधयक तयार करून तो प्रसारित केला.

कळ शब्द : कृषी क्षेत्र,उत्पन्न,व्यापार,कायदा

**प्रस्तावना :**

शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढविण्याच्या उद्देशाने, केंद्र सरकार कृषी विपणनाला कार्यक्षमता आणि परिणामकारकता प्रदान करण्यासाठी तयारी केली आहे.कृषी आणि संलग्न क्षेत्रात कार्यरत शेतकऱ्यांसाठी ग्रामीण भारताला चालना देण्याच्या उद्देशाने राष्ट्रपतींनी अध्यादेश जारी केले आहेत.केंद्र सरकारने शेती क्षेत्राशी संबंधित तीन अध्यादेश आणले आहेत. ज्यांचे रुपांतर कायद्यात करण्यात आले आहे. नवीन कायद्यामुळे एक परिसंस्था तयार होईल, जिथे शेतकरी व व्यापाऱ्यांना कृषी उत्पादनांची विक्री व खरेदीची स्वतंत्रता मिळेल. राज्य कृषी उत्पन्न विपणन कायद्यांतर्गत अधिसूचित बाजारपेठेच्या आवारांच्या बाहेरील अडथळा मुक्त आंतरराज्यीय व्यापार आणि वाणिज्य व्यापार यांना प्रोत्साहन मिळेल. शेतकऱ्यांकडून त्यांच्या उत्पादनांच्या विक्रीसाठी कोणताही सेस किंवा आकारणी केली जाणार नाही. वाहतुकीचा खर्चही त्यांना सहन करावा लागणार नाही. अखंड व्यापार इलेक्ट्रॉनिकदृष्ट्या सुनिश्चित करण्यासाठी विधेयकाद्वारे व्यवहाराच्या व्यासपीठामध्ये इलेक्ट्रॉनिक व्यापाराचा प्रस्ताव आहे. केंद्र सरकारच्या मतानूसार या कायद्यांमधील शेतकऱ्यांना संपूर्ण संरक्षणाची हमी देण्यात आली आहे. हा कायदा अंमलात आल्यावरही सरकार एमएसपी दराने शेतमाल खरेदी सुरूच ठेवेल अशी हमी देण्यात आली आहे.

**कृषी व्यवस्थेचा इतिहास :**

भारतीय शेतमाल बाजाराचा पूर्वेतिहास बघितला तर तो सरळ सरळ दोन कालखंडात विभागता येतो. इंग्रज येण्यापूर्वीची शेतमाल बाजार व्यवस्था व देशातील अनिर्बंध सावकारीला आळा बसावा म्हणून आणलेल्या कृषि उत्पन्न बाजार समितीच्या कायद्याच्या उगमानंतर तयार झालेली नवी व्यवस्था यांचा समावेश करता येईल. पहिल्या भागात शेती उत्पादनाचे केंद्रच ग्रामीण भाग असल्याने शतकानुशतके वापरात असेलेली आठवडे बाजाराची वितरण व्यवस्था व त्यानुरुप विकसित झालेल्या शेतमालाच्या घाऊक बाजारपेठा या असेपर्यंत शेतमाल बाजारात एक प्रकारचे संतुलन राखले जात आहे.मात्र इंग्रज आल्यानंतर त्यांचा मूळ उद्देश राज्य करणे या नावाखाली व्यापाराच्या संधी विकसित करणे हाच असल्याने या व्यापाराची परिमाणे बदलू लागली व हा व्यापार नवे रुप धारण करू लागला. म्हणजे भारतीय शेतमाल बाजारात एक नवा खेळाडू आल्याने शेतमालाची उपलब्धता व वितरण यात नव्या गरजा निर्माण होऊ लागल्या. इंग्रजांना या व्यवस्थेतून सरळ शेतकऱ्यांकडून शेतमाल खरेदी करणे हे भौगोलिक व मनुष्यबळाच्या दृष्टीने जिकिरिचे असल्याने पिकाच्या हंगामात सारा शेतमाल एके मध्यवर्ती ठिकाणी आणून एक गठ्ठा खरेदी करण्याच्या उद्देशाने नवी व्यवस्था निर्माण करणे आवश्यक होते.याच वेळी इंग्रजांना शेतकऱ्यांकडून सरळ माल मिळण्यातली अडचण ही परंपरागत व्यापारी, (त्यांना सावकार समजले जात असे) जे शेतकऱ्यांना देण्यात येणाऱ्या पतपुरवठा व्यवस्थेचा प्रमुख भागही होते. त्यांच्यातील काही शोषणप्रवण सावकारीचा चाणाक्षपणे वापर करत इंग्रजांनी या शेतमालाचा ओघ आपल्याकडे वळवण्यासाठी कृषीउत्पन्न खरेदी विक्री नियमन कायदा आणला व त्याला सावकारीवर आळा घालण्याचे कारण देण्यात आले. या पद्धतीत काही प्रमाणात हा प्रकार असेलही मात्र शेतकऱ्यांच्या तक्रारींचे प्रमाण लक्षात घेता आजारापेक्षा उपायच घातक असे नंतरच्या कालखंडात लक्षात आले. इंग्रजांना स्वारस्य असलेल्या कापूस,साखर अशा निर्यात व व्यापारक्षम शेतमाल क्षेत्रात मूलभूत सुविधा आणत त्यात सकारात्मक चित्र दिसत असतांनाच इतर शेतमाल क्षेत्रात बाजार समिती कायद्याच्या आडून एक घातक शोषण व्यवस्था निर्माण होत होती. व निर्यात व्यापाराचे संरक्षण न लाभलेल्या शेतमालाच्या बाजारात नव्या विकृतींचा प्रवेश झालेला दिसून येतो. स्वातंत्र्यानंतर १९६३ साली या शेतमाल खरेदी विक्री नियमन कायद्यात काही जुजबी बदल करत त्याचे व्यवस्थापन सहकारी तत्त्वावर आणले आहे. तीच व्यवस्था बाजार समित्यांच्या नावाने सुरू राहिली. या नव्या बाजारात खरेदीदार इंग्रज नव्हते तर एकाधिकारी व्यापाऱ्यांची एक नवी संस्कृती उदयास येत पोरक्या शेतमाल शोषणाचे एक नवे पर्व सुरू झाले. (हा भारतीय कार्पोरेटसचा उगम समजला जातो).या नव्या पर्वाचे दुष्परिणाम आज सारे कृषिक्षेत्र भोगत असून या कायद्याचा नीट अर्थ न लावत अंमलबजावणी केल्याने व एकाधिकार शक्तींच्या प्रलोभन नंतर आलेली सारी राजकीय व्यवस्था बळी पडत गेल्याचे दिसते.अशी ही बंदिस्त व नियंत्रित बाजार व्यवस्था शेतमाल शोषणप्रवण ठरत असली तरी शेतकरी संघटनेने ऐंशींच्या शतकात केलेल्या खुलेपणाच्या मागणीत हा बाजार खुला करून त्यातील सरकारी व शोषक हस्तक्षेप थांबवण्याची मागणी करण्यात आली. मात्र शेतकरी संघटनेच्या मागणीतही खुलेपणाचा एक भाग म्हणूनच बाजार व्यवस्था धरण्यात आली व तिचे प्रत्यक्षातील शेतमालाचे शोषण करणारा कायदा, त्याची कार्यपद्धती व परिणाम यापेक्षा सरकारी धोरणांचा शेतमाल भावावरील परिणाम या व्यापक कारणाखाली ती काहीशी दुर्लक्षित झाली. पुढे सरकारच्या समाजवादी धोरणांमुळे उद्भवलेल्या आर्थिक अराजकामुळे भारताला जागतिकीकरण स्वीकारावे लागले. व देशाच्या अनेक धोरणात, विशेषतः आर्थिक धोरणात जे काही सुधार स्वीकारावे लागले त्यात जागतिक व्यापार संस्थेशी करार करावा लागला. त्यातून विविध प्रकारची माहिती पुढे आली. देशोदेशींच्या आपापसातील व्यापारात ते देश देत असलेल्या अनुदानांचा अभ्यास व माहिती संकलित करतांना त्यावेळचे वाणिज्य मंत्री प्रणव मुखर्जी यांनी भारताची माहिती देतांना सांगितले की, भारतातील शेतमाल बाजार हा बंदिस्त असून त्यातून आम्ही शेतकऱ्यांना भाव देतांना कुठलेही अनुदान

देत नाही, तसेच शेतमालाची किंमत देतांना १०० रु.पैकी शेतकऱ्यांच्या हाती केवळ ७९ रुपयेच देतो, म्हणजे त्यावर २१ टक्के उणे अनुदानाचा बोजा टाकतो. ही माहिती आश्चर्यकारक तर होतीच पण भारतीय शेतमालाची विदारक अवस्था स्पष्ट करणारी होती.

**नवीन कृषी विधेयक :**

लोकसभेत सरकारकडून शेतकऱ्यांच्या हितासाठी एक पाऊल पुढे टाकताना कृषी विधेयक जो लोकसभेत १९ सप्टेंबर २०२० रोजी मंजूर केला आहे. तीन विधेयके संमत करण्यात आली. यावेळी विरोधकांनी प्रचंड गोंधळ घातला होता तरी ही विधेयक मंजूर झाले आहेत.या गोंधळातच शेतकरी उत्पादने व्यापार व वाणिज्य (प्रोत्साहन व सुविधा) विधेयक २०२०, आणि शेतकरी (सशक्तीकरण आणि संरक्षण) किंमत आश्वासन आणि कृषी सेवा करार विधेयक २०२०, अत्यावश्यक वस्तू (दुरुस्ती) विधेयक, २०२०.ही विधेयकं मंजूर करण्यात आली.

या विधेयकांबद्दल कृषी सुधारणांशी संबंधित तिन्ही विधेयक राज्यसभेत व लोकसभेत मंजूर झाली आहेत. आवाजी मतदानानं ही विधेयकं मंजूर करण्यात आली. केंद्र सरकारने शेतकऱ्यांशी संबंधित तीन अध्यादेशांचं आता कायद्यात रुपांतर झाले आहे. शेतमाल विकण्यासाठी शेतकऱ्यांना मार्केटमध्ये जावे लागत असे आणि व्यापारी या बाजारातून माल खरेदी करत असत. मात्र आता नव्या विधेयकानुसार व्यापारी मार्केटबाहेरूनही शेतकऱ्यांकडून शेतमाल खरेदी करू शकतात. सरकारने बटाटा, कांदा,डाळी,खाद्य तेल, धान्य आदि वस्तू अत्यावश्यक वस्तूंच्या लिस्टमधून वगळल्या आहेत. इतकंच नव्हे तर सरकारने कॉन्ट्रॅक्ट शेतीला चालना देण्यासाठी पावले उचलली आहेत. आतापर्यंत खरेदी-विक्रीची जी व्यवस्था सुरू होती त्यात शेतकऱ्यांचे हातपाय बांधलेले होते. जुन्या कायद्यांच्या आडून ताकदवान टोळ्या तयार झाल्या होत्या. या व्यवस्थेने शेतकऱ्यांचा गैरफायदा घेतला होता. हे कुठेपर्यंत चालणार होतं? असा प्रश्न विचारत हे विधेयक मंजूर झाल्याबद्दल सत्ताधाऱ्यांनी देशातल्या शेतकऱ्यांचे अभिनंदन केले आहे. मंडई व्यतिरिक्त फार्मगेट, कोल्ड स्टोरेज, कोठार, प्रक्रिया उद्योग इ. वर व्यापार करण्याचे स्वातंत्र्य शेतकरी थेट विपणन करण्यात व ज्या मध्यस्थांना दूर केले जाईल ज्यामुळे किंमतीची पूर्ण प्राप्ती होईल.

नवीन कायद्यांमधून प्रोसेसर, घाऊक विक्रेते, ग्रेडर, मोठे किरकोळ विक्रेते, निर्यातक इत्यादींशी सहभाग घेण्यास शेतकऱ्यांना सक्षम बनविण्यात येईल. पिकाची पेरणी होण्यापूर्वीच शेतकऱ्यांना हमीभाव मिळेल. हे बाजारपेठेतील अनिश्चिततेची जोखीम शेतकऱ्यांकडून प्रायोजकांकडे हस्तांतरित होणार आहे. अगोदरचं किमती ठरविल्यामुळे, बाजारभावातील वाढ आणि घसरण यापासून शेतकरी बच्यावले जातील. यामुळे शेतकऱ्यांना आधुनिक तंत्रज्ञान, उत्तम बियाणे व इतर साधने मिळविता येतील. यामुळे विपणनाची किंमत कमी होईल आणि शेतकऱ्यांचे उत्पन्न सुधारेल. निवारणासाठी स्पष्ट विवादासाठी प्रभावी विवाद निराकरण यंत्रणा पुरविली गेली आहे. कृषी क्षेत्रातील संशोधन आणि नवीन तंत्रज्ञानास प्रोत्साहन मिळणार आहे. सरकारने गेल्या सहा वर्षात अनेक उत्पादकांना शेतकऱ्यांना त्यांच्या पगाराचे दर वेतन मिळावे आणि शेतकऱ्यांचे उत्पन्न व रोजीरोटीची स्थिती वाढवावी यासाठी अनेक महत्त्वपूर्ण निर्णय घेतले आहेत. नवा कायदा लागू झाल्यावरही शेतमालाची किमान आधारभूत किमतीवर खरेदी सुरूच राहील.

**कायद्यातील मुख्य तरतुदी :**

अ) शेती उत्पन्न व्यापार आणि वाणिज्य (प्रोत्साहन व सुलभता) विधेयक २०२० –

१) या अंतर्गत सरकारची योजना आहे की असे तंत्रविकसित केले जाईल ज्यामुळे शेतकऱ्यांना आपल्या आवडत्या ठिकाणी वस्तू विकता येणार आहेत.

२) यानुसार शेतकरी दुसऱ्या राज्यांतील लायसन्सधारक व्यापाऱ्यांशी व्यापार करू शकतात.

३) या विधेयकामुळे शेतमालाला कृषी उत्पन्न बाजार समितीच्या आवाराबाहेर जाऊन आंतरराज्य आणि आंतरजिल्हा विक्री करण्याची मुभा मिळाली आहे.

४) इलेक्ट्रॉनिक व्यापाराचीही तरतूद या विधेयकात करण्यात आली आहे.

५) विशेष म्हणजे राज्य सरकारकडून लावलं जाणारं बाजार शुल्क, सेस किंवा कोणत्याही प्रकारचा कर आता रद्द करण्यात आला आहे.

६) व्यापार क्षेत्राच्या बाहेर कोणताही कर आता भरावा लागणार नाही. याचाच अर्थ या विधेयकामुळे तीन महत्त्वाचे फायदे शेतकऱ्यांना होणार आहेत. एक म्हणजे शेतकऱ्यांना लुटणारी बाजार समितीमधील दलाली बंद होईल, दुसरं मालाला मोठी बाजारपेठ मिळवता येईल आणि तिसरा फायदा म्हणजे शुल्क भरावं लागणार नाही.

७) भारतात सध्याही काही प्रमाणात कंत्राटी शेती पाहायला मिळते. पण याला कायदेशीर स्वरूप देण्याचा हा प्रयत्न आहे.

८) आपल्या पिकासाठी घाऊक विक्रेते, प्रोसेसिंग इंडस्ट्री किंवा कंपन्यांशी करार करता येईल. त्यासाठी किंमतही ठरवता येईल.५ हेक्टरपेक्षा कमी जमीन असलेल्या शेतकऱ्यांना कंत्राटांचा फायदा होईल.

९) बाजारपेठेतल्या अस्थिरतेचा भार शेतकऱ्यांवर नाही त्यांच्या कंत्राटदारांवर राहील,मध्यस्थांना दूर करून शेतकरी पूर्ण नफा मिळवू शकतात.

ब) शेतमाल हमी भाव आणि शेती सेवा करार (सबलीकरण आणि संरक्षण) विधेयक २०२० –

१) सरकारचा असा दावा आहे यामुळे कॉन्ट्रॅक्ट फार्मिंगला नॅशनल फ्रेमवर्क मिळेल. याचा अर्थ शेतीशी संबंधित समस्या आता शेतकऱ्यांना येणार नाही तर कॉन्ट्रॅक्ट घेणाऱ्यांना असतील.

२) शेतकरी आणि खरेदीदार यांना थेट करार करण्याची मुभा देण्यात आली आहे.

३) कमीत कमी एक हंगाम आणि जास्तीत जास्त पाच वर्षांसाठी शेतकऱ्याला ग्राहकाशी आपला शेतमाल विकण्यासाठी थेट करार करता येईल.

४) शेतमाल उत्पादनाचं मूल्य करारातच समाविष्ट केलेलं असेल. निश्चित मूल्याबाबतचीही तरतूद यात आहे. करारामध्ये काही वाद झाल्यास तो कसा सोडवायचा आणि आव्हान कुठे द्यायचं याविषयीच्या तरतुदी विधेयकात करण्यात आल्या आहेत.

क) अत्यावश्यक वस्तू (दुरुस्ती) विधेयक २०२० –

जवळपास 65 वर्ष जुन्या वस्तू अधिनियम कायद्याला सरकारने दुरुस्तीसाठी आणले आहे. यात कांद्यासह काही खाद्य वस्तू (तेल) इत्यादींना आत्यवश्यक वस्तूंमधून बाहेर करण्यात आले आहे.

१) या विधेयकात बदल करताना सरकारने धान्य,डाळी, तेलबिया, कांदा, बटाटा आदि गोष्टींना अत्यावश्यक वस्तूंच्या यादीतून वगळले आहे.

२) नैसर्गिक आपत्ती किंवा युद्ध अशा अभूतपूर्व परिस्थितीचा अपवाद वगळता सरकार आता साठवणुकीवर बंदी लादू शकणार नाही. या निर्णयामुळे शेती क्षेत्रात थेट परकीय गुंतवणूक येण्यास मदत होईल, असं सरकारचं म्हणणं आहे.

कृषी कायद्याचे शेतकरी वर्गाचे फायदे :

१) सरकारच्या दाव्यानुसार, देशातील ८६ टक्के छोटे आणि मध्यम शेतकरी, ज्यांच्याकडे बार्गेनिंग पॉवर नसते, अशा शेतकऱ्यांना या तरतुदींमुळे फायदा होईल.

२) शेतकऱ्यांना बाजार समितीमध्ये विविध ठिकाणी जो खर्च करावा लागतो, तो खर्च वाचणार असल्यामुळे जास्तीचा फायदा होईल.

३) शेतातही माल विकण्याची मुभा शेतकऱ्यांना आहे.

४) एक म्हणजे शेतकऱ्यांना लुटणारी बाजार समितीमधील दलाली बंद होईल, दुसरं मालाला मोठी बाजारपेठ मिळवता येईल आणि तिसरा फायदा म्हणजे शुल्क भरावं लागणार नाही.

५) व्यापार क्षेत्राच्या बाहेर कोणताही कर आता भरावा लागणार नाही.

६) हे विधेयक राज्य सरकारांना बाजाराबाहेरील शेतीमाल खरेदी व विक्रीवर कोणताही कर लावण्यास मनाई करते आणि शेतकऱ्यांना आपला माल योग्य फायदेशीर किंमतीला विक्री करण्यास परवानगी देते. सरकारचे म्हणणे आहे की या विधेयकामुळे शेतकऱ्यांची आर्थिक स्थिती अधिक मजबूत होईल.

८) सरकारचे म्हणणे आहे की यामुळे खाजगी गुंतवणूक दारांना व्यापार करण्यास सोपे होईल व सरकारी हस्तक्षेपापासून सुटका होईल.

९) कृषि क्षेत्रात परदेशी गुंतवणुकीला देखील प्रोत्साहन मिळेल.

१०) एक आदर्श कृषि कराराचे दिशानिर्देश देखील जारी करणार आहे. जेणेकरून शेतकऱ्याला मदत मिळेल व आर्थिक लाभ मिळवण्यासाठी मध्यस्थाची भूमिका समाप्त होईल.

**एमएसपी(MSP) म्हणजेच किमान आधारभूत किंमत :**

केंद्र सरकारने विविध धान्यांसाठी आणि पिकांसाठी MSP म्हणजेच किमान आधारभूत किमती ठरवलेल्या आहेत. दरवर्षी या किमतींमध्ये बदल केला जातो. मात्र या आधारभूत किमतीने सुद्धा कधीच शेती उत्पादनाची खरेदी होत नाही. त्यासाठी यंत्रणा नसते, आर्थिक तरतूद नसते. त्यामुळे उत्पादन खर्चावर आधारित भाव द्या अशी साधी मागणी शेतकरी करत आहेत. तृणधान्य, कडधान्य, तेलबिया, गहू, मका, सोयाबीन, तूरडाळ, मूग डाळ, मसूर डाळ यांसारख्या अन्नधान्यांच्या किंमती सरकारने ठरवलेल्या आहेत.

त्याचबरोबर भुईमूग, सोयाबीन, सूर्यफूल आणि कापसाचा देखील यामध्ये समावेश आहे. त्यानुसार शेतकऱ्यांचा माल खरेदी करण्याचे आदेश बाजार समित्यांना दिलेले असतात. मात्र यामध्ये महत्त्वाची गोष्ट म्हणजे केंद्र सरकार या किंमतींची घोषणा करते. किमान आधारभूत किंमत ठरवण्याचा संपूर्ण अधिकार हा केंद्र सरकारकडे आहे. मात्र या लागू करण्यासाठी कोणताही कायदा अस्तित्वात नाही. केवळ उसाच्या किमतीसाठी कायदा असून यामध्ये 14 दिवसांच्या आत साखर कारखान्यांना शेतकऱ्यांना पैसे देणं बंधनकारक आहे. दरम्यान, शेतकऱ्यांच्या या किमान आधारभूत किमतींविषयी आणि इतर आंदोलनावर सरकारने स्पष्टीकरण दिले आहे. यांनी यावर स्पष्टीकरण देताना या किमान आधारभूत किमतीनुसार शेतकऱ्यांचा माल खरेदी केला जाणार असल्याचं स्पष्ट केलं आहे. मात्र महत्त्वाची गोष्ट म्हणजे ही किंमत तळागाळातील शेतकऱ्यांना मिळते की नाही हे पाहणं महत्वाचं ठरणार आहे. २०१९-२०२० दरम्यान एमएसपीचा दर वाढविण्यात आला असून रब्बी हंगामातील एमएसपी जाहीर होईल. केंद्रीय कृषिमंत्र्यांनी सांगितले की या कायद्यांमधील शेतकऱ्यांना संपूर्ण संरक्षण देण्यात आले आहे. एकीकडे कृषी विधेयकांवरून विरोधक आक्रमक झाले असताना, दुसरीकडे केंद्र सरकारने किमान आधारभूत किंमत (MSP) वाढवण्याचा निर्णय घेतला आहे. केंद्रीय मंत्रिमंडळाच्या आर्थिक विषयासंबंधी समितीने MSP वाढवण्याला मंजुरी दिली आहे. सहा रबी पिकांसाठीची नवी किमान आधारभूत किंमतही केंद्रीय कृषिमंत्र्यांनी जाहीर केली. कृषी विधेयकांना विरोध करताना विरोधक मुख्यत: आरोप करत आहेत की, किमान आधारभूत किंमतीवर मोठा परिणाम होईल. अशावेळी केंद्रीय मंत्रिमंडळाने किमान आधारभूत किंमत वाढवण्याला मंजुरी दिल्यानं या निर्णयाचं महत्त्व वाढले आहे.

MSP वाढवण्यात आली आहे, ती पुढील प्रमाणेस्पष्ट करता येईल.

विपणन हंगामासाठी सर्व रब्बी पिकांसाठी किमान आधारभूत किंमत २०२१-२०२२

| पिके | आरएमएस(RMS)एमपीएस (MPS)२०२०-२०२१ (आरएस(RS)/क्विंटल) | आरएमएस(RMS)एमपीएस(MPS)२०२१-२०२२ (आरएस(RS)/क्विंटल) | उत्पादनासाठी खर्च२०२१-२२ (आरएस(RS)/क्विंटल) | एमपीएस(MPS)मध्ये वाढ (आरएस(RS)/क्विंटल) | जास्त किंमतीचा परतावा (टक्केवारीत ) |
|---|---|---|---|---|---|
| गहू | १९२५ | १९७५ | ९६० | 50 | १०६ |
| सातू | १५२५ | १६०० | ९७१ | ७५ | ६५ |
| हरभरा | ४८७५ | ५१०० | २८६६ | २२५ | ७८ |
| मसूर | ४८०० | ५१०० | २८६४ | ३०० | ७८ |
| मोहरी | ४४२५ | ४६५० | २४१५ | २२५ | ९३ |
| केसर | ५२१५ | ५३२७ | ३५५१ | ११२ | 50 |

शेतकऱ्यांच्या हितासाठी काम करणे हा आमच्यासाठी मोठा विशेषाधिकार आहे. अन्न प्रदात्यांच्या हितासाठी काम करण्याच्या आमच्या प्राथमिकतेच्या अनुषंगाने मंत्रिमंडळाने एमएसपी वाढविण्याचा आणखी एक ऐतिहासिक निर्णय घेतला आहे. याचा फायदा कोट्यावधी शेतकऱ्यांना होणार आहे.असे सरकारचे मत आहे.

**विरोधकांचे आक्षेप :**

लोकसभेत कृषी संबंधी विधायकांना शेतकरी तसेच राजकीय पक्ष विरोध करत आहेत. शिरोमणी अकाली दलाच्या नेत्या आणि अन्न प्रक्रिया उद्योग मंत्री हरसिम्रत कौर बादल यांनी यासाठी विरोध करताना मंत्रीपदाचा राजीनामाही दिला आहे. शेतकऱ्यांना चिंता सतावतेयय की जसे हा कायदा लागू होईल तसे सरकारकडून मिळणाऱ्या शेती संबंधित सुविधा यासोबतच MSP चा हक्क संपेल अशी भीती शेतकऱ्यांना आहे. त्यामुळेच शेतकरी याला विरोध करत आहेत. या तीन विधेयकांबाबत शेतकऱ्यांमध्ये निर्माण झालेला असंतोष कमी करण्यासाठी सरकाकडून त्यांना समजावण्याचे हरतऱ्हेचे प्रयत्न झाले मात्र शेतकऱ्यांसोबत सहकारी पक्षही या मुद्यावर सरकारला साथ देताना दिसत नाही आहेत.

कृषीसंबंधी विधेयक लोकसभेत(Agriculture Bills 2020 pass in loksabha) संमत झाल्यानंतर सरकारच्या अडचणी वाढलेल्या दिसत आहे. विरोधी पक्षांसोबतच आता सहकारी पक्षही याचा विरोध करताना दिसत आहेत. इतकंच नव्हे तर खुद्द शेतकरीही या विधेयकाच्या विरोधात असून देशभरात याविरोधात आंदोलने होत आहेत. मोठा राजकीय विरोध असूनही संसदेने शेतकऱ्यांचे उत्पादन व्यापार व वाणिज्य (पदोन्नती आणि सुलभता) विधेयक, २०२० आणि शेतकऱ्यांचे (सबलीकरण आणि संरक्षण) किंमत आश्वासन आणि शेत सेवा विधेयक, २०२० मंजूर केले. ह्या कायद्यांमुळे शेती क्षेत्रात दूरगामी आणि शेतकऱ्यांच्या हिताचे फायदे होतील, असा केंद्र सरकारचा दावा आहे. ह्या कायद्याच्या तरतूदीवर काही आक्षेप घेण्यात आलेत.

१) या विधेयकांमध्ये सर्वात जास्त विरोध किमान आधारभूत किंमतीवरून होत आहे. शेतकऱ्यांना भिती आहे की सरकार या विधेयकांच्या नावाखाली किमान आधारभूत किंमत मागे घेऊ इच्छित आहे. तर दुसरीकडे कमिशन एजेंट्सला चिंता आहे की नवीन कायद्यामुळे त्यांचे कमिशनद्वारे येणारे उत्पन्न बंद होईल.

२) नवीन विधेयकांमधील तरतुदींनुसार छोट्या शेतकऱ्यांसाठी अनेक पर्याय देण्यात आले आहेत. पंजाब आणि हरियाणातील कमिशन एजंट्सवर याचा मोठा परिणाम होणार आहे.

३) बाजार समित्यांमधील हजारो कामगारांवर याचा परिणाम होईल, असे म्हटले जात आहे. तर पंजाब आणि हरियाणा सरकारला मिळणाऱ्या करालाही यामुळे फटका बसणार आहे.

४) शेतकऱ्यांना चांगली किंमत मिळावी. आणि त्यांच्या मालाला लवकरात लवकर गिऱ्हाईक मिळावं यासाठी या सुविधा केल्या जात असल्याचं सरकारचं म्हणणं आहे. पण याबद्दल APMC बाहेर विक्री झाल्यास 'बाजार शुल्क' न मिळाल्याने राज्यांचं नुकसान होईल.

५) बाजार समित्या हद्दपार झाल्यास मध्यस्थ, आडते यांचं काय होणार? किमान आधारभूत किंमतीची यंत्रणा यामुळे मोडकळीस येईल. E-NAM सारख्या ई-ट्रेडिंग यंत्रणा बाजारांवर अवलंबून असतात. बाजारच नामशेष झाले तर त्या कशा चालतील? मोठ्या कंपन्या वाटेल तेवढा साठा करू शकतील.

६) शेतकऱ्यांना कंपन्यांच्या सांगण्याप्रमाणे उत्पादन करावं लागेल आणि कमी किंमत मिळण्याचीही भीती कांदा निर्यातबंदी सारख्या निर्णयांमुळे हा कायदा अंमलात आणला जाईल का याबद्दल साशंकता आहे.

**तरतूदी बद्दलच्या शंका :**

१) कराराच्या शेतीखाली शेतकऱ्यांवर दबाव येईल आणि त्यांना भाव निश्चित करता येणार नाही. लहान शेतकरी कंत्राटी शेतीचा अभ्यास कसा करू शकतील, यात त्यांना फटका बसण्याची शक्यता आहे. नवीन यंत्रणा शेतकऱ्यांसाठी अडचणीची ठरणार आहे. संभावीत वाद झाल्यास मोठ्या कंपन्यांचा फायदा होईल.

२) किमान अधारभूत दरावरील खरेदी थांबेल का? एपीएमसी मंडळाबाहेर शेतीमाल विकल्यास त्यांचे कामकाज थांबेल का? ई-एनएएम सारख्या शासकीय इलेक्ट्रॉनिक व्यापार पोर्टलचे भविष्य काय असेल?

३) बाजार समित्यांमध्ये आपल्या शेतमालाची खरेदी हमीभावाने होणार नाही, अशी भीती शेतकऱ्यांमध्ये आहे.

४) बाजार समितीच्या बाहेर शेतमाल विकल्यामुळे शुल्क द्यावं लागणार नाही आणि त्यामुळे फायदा होईल, असा दावा सरकारने केला आहे. दरम्यान, बाजार समितीच्या बाहेर कमी दर मिळाल्यास पुन्हा बाजार समितीमध्ये हमीभावाने विक्री करण्याचा पर्याय शेतकऱ्यांसमोर असेल. अनेक बाजार समित्यांमध्ये ८.५ टक्क्यांपर्यंत कर वसूल केला जातो, ज्याची वसुली शेतकऱ्यांकडून केली जाते.

**सरकारचे स्पष्टीकरण :**

१) किमान आधारभूत किमतीत खरेदी सुरूच राहील, शेतकरी आपले उत्पादन एमएसपी दराने विकू शकतात. रब्बी हंगामासाठी एमएसपी जाहीर होईल.

२)मंडईचे कामकाज थांबणार नाही, येथे पूर्वीप्रमाणेच व्यापार सुरू राहील.

३) नव्या यंत्रणेअंतर्गत शेतकऱ्यांना मंडई व्यतिरिक्त इतर ठिकाणीही त्यांचे उत्पादन विकण्याचा पर्याय असेल.

४) ई-एनएएम ट्रेडिंग सिस्टमही मंडईंमध्ये सुरू राहील. इलेक्ट्रॉनिक प्लॅटफॉर्मवर शेतीच्या उत्पादनांचा व्यापार वाढेल. यामुळे अधिक पारदर्शकता आणि वेळ बचत होईल.

५) शेतमालाला त्याच्या आवडीच्या उत्पादनाची विक्री किंमत निश्चित करण्याच्या करारामध्ये पूर्ण अधिकार असेल. त्यांना जास्तीत जास्त 3 दिवसांत पैसे देय मिळेल.

६) देशभरात १०००० शेतकरी उत्पादक संस्था स्थापन केल्या जात आहेत. हे एफपीओ लहान शेतकऱ्यांना एकत्र आणतील आणि शेती उत्पादनांसाठी मोबदला देण्याचे सुनिश्चित करण्यासाठी कार्य करतील. करारावर स्वाक्षरी केल्यानंतर, शेतकरी व्यापाऱ्यांचा शोध घेणार नाही.

७) खरेदी करणारा ग्राहक थेट शेतामधून उत्पादन घेईल. काही वाद झाल्यास वारंवार कोर्टात जाण्याची गरज भासणार नाही. त्यासाठी स्थानिक विवाद निराकरण यंत्रणा असेल.

८) देशातील प्रत्येक शेतकऱ्यांना एमएसपी यंत्रणा पूर्वीप्रमाणेच कार्यरत राहील. यावर्षी बीरमध्ये गहू, धान, डाळी, तेलबिया यासह शेतक्यांना 1 लाख 13 हजार कोटी रुपये मिळाले. एमएसपी येथे दिले आहे. गेल्या वर्षीच्या तुलनेत ही रक्कम 30% पेक्षा जास्त आहे.

९) सद्य व्यवस्थेशी इतक्या लाभार्थ्यांचे ज्यात आपली राजकीय व्यवस्था, सरकारे, त्यात वाटा असलेले व्यापारी, दलाल, अडते यांच्या बरोबर इतर सेवा देणारे हमाल, मापारी, माथाडी, विपणन व्यवस्थेतील वाहतूकदार, किरकोळ व्यापारी यांचा एक मोठ्या वर्गाचे स्वार्थ जुळलेले आहेत. त्यामुळे त्या अशा सहजासहजी बरखास्त करता येणार नाहीत. ते शेतकऱ्यांच्याच नव्हे तर साऱ्यांच्याच नुकसानीचे ठरू शकेल.

**सूचना :**

सध्याच्या बाजार समित्यांमध्ये एक मुक्तद्वार विभाग ठेवावा व त्यात असे मुक्त व्यवहार होऊ द्यावेत. त्यात पुरवल्या जाणाऱ्या साऱ्या सेवा ऐच्छिक असाव्यात त्यात स्पर्धात्मक वातावरण ठेवत शेतकऱ्याला वाटेल त्या सेवा तो घेऊ शकेल. या सेवा व इतर कर शेतकऱ्याच्या विक्री रकमेतून परस्पर न कापता त्या शेतकऱ्यांना भरता येतील असे बघावे. सुरुवातीला या मुक्तद्वार विभागात रोखीच्या व्यवहारांना प्राधान्य द्यावे. शेतकऱ्यांच्या खात्यात पैसे जमा झाल्यानंतर व्यापाऱ्याला फिजिकल डिलिवरी देता येईल. या सवयी अमलात आणायला सुरुवातीला कठीण गेल्यातरी आजच्या शोषक व अस्ताव्यस्त बाजाराला नीट वळण लागून त्यात शिस्त येऊ शकेल. यात बँकिंग क्षेत्राला वाव असून त्यांनी देणारा व घेणाऱ्यांना सोईस्कर ठरतील अशा सोई उपलब्ध करून दिल्या तर आर्थिक व्यवहार सुलभ व सुरळीत होऊ शकतील.

**समारोप :**

नवीन सुधारित वातावरणामध्ये कृषी क्षेत्राच्या विकास आणि वृद्धीसाठी त्यांच्या निरंतर सहकार्याची आवश्यकता आहे. केंद्र सरकारने मंजूर केलेल्या कृषी विधेयकांचे काही फायदेही आहेत आणि तोटेही आहेत.भारतीय शेतमाल बाजारात निर्माण झालेला एकाधिकार निपटण्याची मानसिकता व क्षमता राहिली नसून त्याचे परिणाम दिसत आहे. यामुळेच देशाची अर्थव्यवस्थाच धोक्यात येत आहे. निर्यातीवरही घातक परिणाम झालेला आहे. बहुराष्ट्रीय कंपन्यांनी फायदा घेऊन शेतकऱ्यांच्या मेहनत वाया जाऊ नये, अशी काहींना भीती आहे. कृषी विधेयकांमुळे शेतकऱ्यांचं उत्पन्न वाढवण्यास मदत होईल. वाढवलेली किमान आधारभूत किंमत शेतकऱ्यांना बळ देईल आणि त्यांचं उत्पन्न दुप्पट करण्यात योगदान देईल. संसदेत मंजुरी मिळालेल्या कृषी सुधारणा विधेयकांसोबत वाढलेली किमान आधारभूत किंमत शेतकऱ्यांचा सन्मान आणि समृद्धीत भर घालेल.कृषी क्षेत्राला वाव मिळणार आहे, तर सेवा देणारा व घेणाऱ्यांना सोईस्कर ठरतील. अशा सोई उपलब्ध करून दिल्या तर आर्थिक व्यवहार सुलभ व सुरळीत होऊ शकतील.या विधेयकांमुळे नवीन कृषी व्यवस्था अस्तित्वात येईल.व कृषी व्यवस्थेला चालना मिळेल.

**संदर्भ :**

१) नवीन कृषी कायदा २०२० संसद विधेयक प्रस्ताव

२) http://krishi.maharashtra.gov.in/

३) https://www.bbc.com/

४) https://agricoop.nic.in/

५).https://www.who.in/